नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/११/२०२५ (शनिवार )**

## अनैतिक देहव्यापार करणाऱ्या आरोपीवर — अनै. मानवी. वाहतूक प्रतिबंध पथक, नागपूर ग्रामीण ने केली कारवाई

**पोलीस स्टेशन खापा :—** दिनांक ३१/१०/२०२५ रोजी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, नागपूर ग्रामीण यांना पो.स्टे. खापा अंतर्गत वाकी सुंदरवन रिसॉर्ट व लॉजींग येथे आरोपी नामे १) क्रिष्णा कवडूजी भराडे वय ५२वर्ष रा. नारी वस्ती, तक्षशिला नगर, नागपूर व २) बाळा श्रीपत पाटील वय ५२वर्ष रा. महादूला त. पारशिवनी जि. नागपूर हे स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी पिडीत महिलेस पैशाचे आमिष दाखवून तिच्याकडून अनैतिक देहव्यापार करत असल्याची गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशिर माहिती मिळाल्याने अनै. मा. वा. प्रति. कक्षाने बोगस पंटर तयार करून घटनास्थळी पाठविले व पंचासमक्ष घटनास्थळ सुंदरवन रिसॉर्ट व लॉजींग, वाकी येथे धाड टाकली असता नमूद आरोपी स्वत:च्या आर्थिक फायदया करीता व कुंटनखाण्याच्या कमाईवर स्वत:ची उपजिविका चालविण्यासाठी ग्राहकांकडून पैसे घेवून पिडीत महिलेकडून देहव्यापार करित असल्याचे समक्ष मिळून आल्याने **आरोपी नामे १) क्रिष्णा कवडूजी भराडे वय ५२वर्ष रा. नारी वस्ती, तक्षशिला नगर, नागपूर व २) बाळा श्रीपत पाटील वय ५२वर्ष रा. महादूला त. पारशिवनी जि. नागपूर** यांना ताब्यात घेतले व पिडीत महिलेची सुटका करण्यात आली. तसेच आरोपीतांकडून व गुन्ह्याच्या घटनास्थळावरून १) एक बेडसिट कि. ००/— रू, २) दोन मोबाईल कि. १४,०००/— रू. ३) स्वीप्ट कार क्र. एम.एच. ४९/बी.के. १९१४ कि. ४,००,०००/— रू. ४) बोगस पंटर कडून घेतलेले १०००/— रू. ५) हॅन्ड बॅग मधून नगदि १०००/— रू. आणि ६) क्यूपीड कंपनिचे कंडोम बंद पॉकीट, एक रजीस्टर आणि वारलेले दोन क्यूपीड कंपनिचे कंडोम असा **एकुण किंमती ४,१६,०००/— रु. चा मुद्देमाल**

**जप्त** करून आरोपीतांविरूध्द पो.स्टे. खापा येथे अप. क्रं. ६३२/२५ **कलम ३,४,५ स्त्रीया व मुली अनैतीक व्यापार प्रतीबंध अधि १९५६ सहकलम ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.**

सदर कारवाई मा. पोलीस अधिक्षक, ना.ग्रा. श्री. हर्ष ए पोद्दार व मा. अपर पोलीस अधिक्षक, ना.ग्रा. श्री. अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, नागपूर ग्रामीण चे पोलीस निरीक्षक, श्री. मिलींद तायडे, पोलीस उप निरीक्षक श्री. मंगेश वानखेडे, सहा. फौजदार मनोज मेंडूले, पोलीस कॉन्स्टेबल पन्नालाल बटाऊवाले, हर्षल धांडे, निलेश बर्डे आणि महिला पोलीस अंमलदार ज्योती वानखेडे, अर्चना कांबळे आणि अश्विनी वाघमारे यांनी पार पाडली.



## अवैधरित्या देशी, विदेशी आणि मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई

**(एकूण १५ आरोपीविरूध्द १५ गुन्हे नोंद. एकूण १४,६२५ /— रू. चा मुद्देमाल जप्त)**

पोलीस स्टेशन कुही:— दिनांक ३१/१०/२०२५ रोजी **पो.स्टे. कुही** येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण ३ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून **१) मौजा — वग टोली, कुही** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे प्रेमदास मारोती कामठे वय ६५ वर्ष रा. वग टोली, तह. कुही जि. नागपुर** वर पंचासमक्ष धाड टाकूण **देशी दारू कोकण संत्रा ९९९** च्या ९० एम.एल. क्षमतेच्या ९ बॉटल प्रति बॉटल ३५/— रू. प्रमाणे एकूण **३१५/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** अन्वये गुन्हा नोंद केला तसेच **२) मौजा कळमना त. उमरेड जि. नागपूर** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे दिनेश मंगललाल बावरिया वय ५५ वर्ष रा. कळमना तह जि. नागपुर** वर पंचासमक्ष धाड टाकूण **देशी दारू भिंगरी संत्रा नं. १** च्या ९० एम.एल. क्षमतेच्या ८ बॉटल प्रति बॉटल ४०/— रू. प्रमाणे एकूण **३२०/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला तसेच **३) मौजा उंद्रि त. कुही** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारी **महिला आरोपी नामे (अबक)** वर पंचासमक्ष धाड कारवाई करून **देशी दारू संत्री** च्या १८० एम.एल. क्षमतेच्या ६ बॉटल प्रति बॉटल ७०/— रू. प्रमाणे एकूण **४२०/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

( अशा प्रकारे पो.स्टे. कुही येथे **एकूण ३ आरोपीविरूध्द ३ गुन्हे नोंद, एकूण किं. १०५५/— रू. चा मुद्देमाल जप्त** )

पोलीस स्टेशन उमरेड:— दिनांक ३१/१०/२०२५ रोजी **पो.स्टे. उमरेड** येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण ३ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून **१) मौजा — दत्तमंदिर जवळ, ईतवारीपेठ, उमरेड** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारी **महिला आरोपी नामे**

**(अबक)** वर पंचासमक्ष धाड कारवाई करून **६ लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण ६००/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** अन्वये गुन्हा नोंद केला तसेच **२) मौजा आदित्य प्रोटीन प्रा. लि. चाय टपरी जवळ, मांगरूळ रोड, उमरेड** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे सुनिल सुर्यभान कंन्नाके वय ४८ वर्ष रा. दुर्गानगरी, उमरेड** वर पंचासमक्ष धाड टाकूण **५ लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण ५००/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला तसेच **३) मौजा बुधवारीपेठ, उमरेड** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे लिगेश्वर श्रावण लश्करी वय ४७ वर्ष रा. बुधवारीपेठ, उमरेड** वर पंचासमक्ष धाड टाकूण **५ लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण ५००/— रू. ची दारू**जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

( अशा प्रकारे पो.स्टे. उमरेड येथे **एकूण ३ आरोपीविरूध्द ३ गुन्हे नोंद, एकूण किं. १६००/— रू. चा मुद्देमाल जप्त** )

पोलीस स्टेशन जलालखेडा:— दिनांक ३१/१०/२०२५ रोजी **पो.स्टे. जलालखेडा** येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण ३ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून **१) मौजा — पारधी बेडा, उमठा ता. नरखेड** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे बाबा सत्यभान भोसले वय ३० वर्ष रा. पारधी बेडा उमठा ता. नरखेड जि. नागपूर** वर पंचासमक्ष धाड टाकून **३० लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण ३०००/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** अन्वये गुन्हा नोंद केला तसेच **२) मौजा थुगावदेव ता. नरखेड** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे साहेबराव विठोबा मोरे वय ४३ वर्ष रा. थुगावदेव ता. नरखेड जि. नागपूर** वर पंचासमक्ष धाड टाकूण **देशी दारू संत्रा नं. १ डिलक्स** च्या १८० एम.एल. क्षमतेच्या ६ बॉटल प्रति बॉटल ८०/— रू. प्रमाणे एकूण **४८०/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला तसेच **३) मौजा**

**थुगावदेव ता. नरखेड** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे** प्रविण उत्तमराव सोनुले वय ३० वर्ष रा. थुगावदेव ता. नरखेड जि. नागपूर वर पंचासमक्ष धाड टाकूण **देशी दारू संत्रा नं. १ डिलक्स** च्या १८० एम.एल. क्षमतेच्या ६ बॉटल प्रति बॉटल ८०/— रू. प्रमाणे एकूण **४८०/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

( अशा प्रकारे पो.स्टे. जलालखेडा येथे **एकूण ३ आरोपीविरूध्द ३ गुन्हे नोंद, एकूण किं. ३९६०/— रू. चा मुद्देमाल जप्त** )

पोलीस स्टेशन बेला:— दिनांक ३१/१०/२०२५ रोजी **पो.स्टे. बेला** येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण २ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून **१) मौजा — झाडे चौक, बेला** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे किशोर सूर्यभान झगडे वय ४६ वर्ष रा. वार्ड क्र. ०४, बेला, त. उमरेड जि. नागपूर** वर पंचासमक्ष धाड टाकून **देशी दारू भिंगरी** च्या १८० एम.एल. क्षमतेच्या ५ बॉटल प्रति बॉटल ७०/— रू. प्रमाणे एकूण **३५०/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** अन्वये गुन्हा नोंद केला तसेच **२) मौजा बस स्टॉप, बेला** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे रमेश नामदेवाराव निमजे वय ४६ वर्ष रा.बेला, त. उमरेड, जि. नागपूर** वर पंचासमक्ष धाड टाकूण **देशी दारू लावणसह संत्रा** च्या १८० एम.एल. क्षमतेच्या १० बॉटल प्रति बॉटल ७०/— रू. प्रमाणे एकूण **७००/— रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला.

( अशा प्रकारे पो.स्टे. बेला येथे **एकूण २ आरोपीविरूध्द २ गुन्हे नोंद, एकूण किं. ७००/— रू. चा मुद्देमाल जप्त** )

पोलीस स्टेशन देवलापार:— दिनांक ३१/१०/२०२५ व दि. ०१/११/२०२५ रोजी **पो.स्टे. देवलापार** येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण २ गुन्हे नोंद करण्यात आले. **पोलीस स्टेशन देवलापार येथे** दिनांक ३१/१०/२०२५ रोजी मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. देवलापार हद्दीतील **मौजा वाघोली** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची

गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे किरन श्रीचंद नरटे वय ३६ वर्ष रा. वाघोली ता. रामटेक** वर पंचासमक्ष धाड कारवाई करून **२० लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण २००० रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला तसेच दिनांक ०१/११/२०२५ रोजी मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. देवलापार हद्दीतील **मौजा वाघोली** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे धनवीर माणीक कोडवते वय ४९ वर्ष रा. बंजार पथरई, ता. रामटेक** वर पंचासमक्ष धाड कारवाई करून **१० लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण १००० रू. ची दारू तसेच** ५० लिटर मोहाफुल रसायन सडवा किमती २५००/— रू आणि इतर दारू काढण्याचे साहित्य किंमती. ४००/— रू असा एकुण **किं. ३,९००/—रू चा मुद्देमाल जप्त** करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला.

( अशा प्रकारे पो.स्टे. देवलापार येथे **एकूण २ आरोपीविरूध्द २ गुन्हे नोंद, एकूण किं. ५९००/— रू. चा मुद्देमाल जप्त** )

**पोलीस स्टेशन वेलतूर**:— दिनांक ३१/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन वेलतूर येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. वेलतूर हद्दीतील **मौजा डोंगरमौदा** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे सचीन मनोहन नौकरकर वय ४६ वर्ष रा. डोंगरमौदा, ता. कुही** याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून १८० एम.एल. क्षमतेच्या ११ बॉटल **देशी दारू संत्रा** प्रति बॉटल किं. ७०/— रू. प्रमाणे एकूण किं. **७७०/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक ३१/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन केळवद येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. केळवद हद्दीतील **मौजा केळवद** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे रोशन नारायण देशमुख, वय ३३ वर्ष रा. तिष्टी ह.मु. वार्ड क्र. ०५ केळवद ता. सावनेर** याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून १८० एम.एल. क्षमतेच्या ८ बॉटल **देशी दारू भिंगरी संत्रा नं. १,** प्रति

बॉटल किं. ८०/— रू. प्रमाणे एकूण किं. **६४०/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**(अशा प्रकारे संपूर्ण नागपूर ग्रामीण घटकात एकूण १५ आरोपीविरूध्द १५ गुन्हे नोंद व एकूण १४,६२५ /— रू. चा मुद्देमाल जप्त**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६८० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ३१/११/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६८० आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी अशा एकुण १०९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण ११५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३४ आरोपी अशा एकुण ६४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २२ आरोपी अशा एकुण १२९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १५२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६८० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने